DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 5.847

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071


| S.N. | Author(s) | ORCID | Title | Page |
|---|---|---|---|---|
| 1. | **DR SMITA RAO DESHMUKH**<br>Principal,<br>Shri Shivaji Arts and Commerce College,<br>Amravati, Maharashtra<br>*principalsmitadeshmukh@gmail.com* | https://orcid.org/0000-0003-0942-3416 | AGONY AND ALIENATION IN DALIT COMMUNITY LIFE IN THE POETRY OF S. JOSEPH | 14 |
| 2. | **MR. VIVEK BHOSALE**<br>Director of Physical Education, PDEA'S College of Engineering, Pune, Maharashtra<br>*vivekbhosale_47@yahoo.co.in*<br><br>**DR. VASANTHI KADHIRAVAN**<br>Professor, Department of Physical Education, University of Mumbai, Mumbai, Maharashtra<br>*dr.vasanthidpeum@gmail.com* | https://orcid.org/0000-0002-9691-6683<br><br>https://orcid.org/0000-0002-2942-9674 | CROSSFIT TRAINING PROGRAMME FOR STRENGTHENING OF PHYSICAL AND PSYCHOLOGICAL FITNESS VARIABLES OF DEGREE COLLEGE MALE STUDENTS | 18 |
| 3. | **JOBIN SEBASTIAN**<br>Research Scholar,<br>Bharathiar University, Coimbatore, Tamil Nadu<br>*jskottaram@gmail.com*<br><br>**DR KK RAMACHANDRAN**<br>Research Guide,<br>Bharathiar University, Coimbatore, Tamil Nadu<br>*dr.k.k.ramachandran@gmail.com* | https://orcid.org/0000-0001-7268-8122<br><br>https://orcid.org/0000-0003-0589-4448 | ANALYSIS TOWARDS THE QUALITY OF WORK-LIFE OF EMPLOYEES WORKING IN NEW GENERATION BANKS IN KERALA | 22 |
| 4. | **DR. BHUSARE SUNANDA RAMCHANDRA**<br>Head, the Department of Philosophy, Shivaji College, Hingoli, Maharashtra<br>*srbhusare44@gmail.com* | https://orcid.org/0000-0002-3232-[illegible] | PHILOSOPHY OF MAHATMA JYOTIRAO PHULE | 29 |
| 5. | **DR. NAVEEN KESHAVRAO GILBILE**<br>Head, Department of Marathi, Nagnath College, Aundha Nagnath, Maharashtra<br>*naveen.vasekar@gmail.com* | https://orcid.org/0000-0002-5947-7619 | SOCIAL CONTEXT IN UTTAM BAWASKAR'S COLLECTION OF STORIES 'BUJGAON' | 32 |
| 6. | **PROF.PRAKASH LABHSHETWAR**<br>Librarian, S.B. Arts and Commerce College, Aheri Dist. Gadchiroli, Maharashtra<br>*librarysbc51@gmail.com* | https://orcid.org/0000-0001-7338-6967 | THE IMPORTANCE OF INFORMATION LITERACY IN THE DYNAMIC IT ERA | 36 |
| 7. | **DR. A. K. DESHMUKH**<br>Department of Commerce, Nagnath College of Arts, Commerce and Science, Aundha Ta. Aundha Dist. Hingoli, Maharashtra<br>*adeshmukh916@gmail.com* | https://orcid.org/0000-0003-2915-8453 | WOMEN'S SELF HELP GROUP MANAGEMENT - A CHALLENGE | 39 |
| 8. | **DR. SANGEETA NARAYANRAO MUNDHE**<br>Department of Marathi, Shivaji College, Hingoli. Maharashtra<br>*sangitamundhe1@gmail.com* | [illegible] | THE EXPRESSION OF FEMALE HEART IN 'THE DHAWALE OF MAHADAMABA' | 42 |


Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

Shivaji College Hingoli

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 5.842

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

# THE EXPRESSION OF FEMALE HEART IN 'THE DHAWALE OF MAHADAMABA'

ORCID
https://orcid.org/0000-0003-4877-3371

DR. SANGEETA NARAYANRAO MUNDHE
Department of Marathi, Shivaji College, Hingoli.
*sangitamundhe1@gmail.com*

Received: 09.02.2021 Reviewed :14.02.2021 Accepted: 21.02.2021

***ABSTRACT***

*Mahanubhav sect is known as the Gangotri of Marathi language. Mahanubhav sect did the work of keeping the flow of Marathi literature flowing in the true sense, enriching it in various literary forms. Swami Chakradhar, the founder of this sect, insisted on accepting the Marathi language. The first prose book in Marathi language, the first character in Marathi language, the first narrative poem, the first poetess were given to the Marathi language by this sect. From the very beginning of Marathi, Mahanubhav sect worked to enrich it with various texts. Marathi literature was written extensively during this period, both in prose and verse. The Mahanubhav sect was an all-encompassing sect. Mahanubhav sect first opened the female Shudradikas through Dharma. Thus, the first female poetess Mahadamba stands in Marathi language. Many women like Abaisa, Demati, Ausa, Baisa joined this sect.*

***KEYWORDS:*** *sect,literary forms,expression*

## उत्कट स्त्री मनाची अभिव्यक्ती म्हणजे महदंबेचे धवळे

**प्रस्तावना:**

मराठी भाषेची गंगोत्री म्हणून महानुभाव संप्रदायाला ओळखले जाते. खऱ्या अर्थाने मराठी साहित्याचा प्रवाह खळाळत ठेवण्याचे, तो विविध वांङ्मय प्रकारांनी समृद्ध आणि संपन्न करण्याचे काम महानुभाव संप्रदायाने केले. या पंथाचे संस्थापक स्वामी चक्रधर यांनी आग्रहपूर्वक मराठी भाषेचा स्वीकार केला. मराठी भाषेतील पहिला गद्यग्रंथ, मराठी भाषेतील पहिले चरित्र, पहिले आख्यान काव्य, पहिली कवयित्री या संप्रदायाने मराठी भाषेला दिली. मराठीच्या प्रारंभ काळीच तिला वैविध्यपूर्ण ग्रंथांनी संपन्न आणि समृद्ध करण्याचे काम महानुभाव संप्रदायाने केले. गद्य आणि पद्य अशा दोन्ही अंगाने मराठी साहित्य या काळात मोठ्या प्रमाणावर लिहिले गेले. महानुभाव संप्रदाय हा सर्वसमावेशक संप्रदाय होता. पहिल्यांदा धर्माची द्वारे स्त्री शुद्रादिकांना महानुभाव संप्रदायाने खुली केली. त्यामुळेच महदंबेच्या रूपाने पहिली स्त्री कवयित्री मराठी भाषेला लाभली. आबाइसा, देमती, आऊसा, बाईसा यासारख्या अनेक स्त्रिया या संप्रदायात सहभागी झाल्या.

महदंबा ही मराठी भाषेतील आद्य कवयित्री म्हणून ओळखली जाते. ती नागदेवाचार्यांची बहीण होती. तिचे मूळचे नाव 'रूपाई' होते. ती विलक्षण बुद्धिमान होती. त्यामुळेच स्वामी चक्रधरांनी तिचे नाव महदाईसा असे ठेवले. त्याचेच संस्कृत रूपांतर पुढे महदंबा असे झाले. महदंबा स्वामी चक्रधर यांच्या सहवासात बराच काळ राहिली असल्यामुळे तिच्या बुद्धिमत्तेला अधिक झळाळी प्राप्त झालेली दिसते. महदंबा मुळातच जिज्ञासक चर्चक वृत्तीची होती. "म्हातारी जिज्ञासक: म्हातारी चर्चक: म्हातारी येथ कांही पुसतचि असे:" असे गौरवोद्गार महदंबेसंबंधी चक्रधरांनी काढले आहेत.

महदंबेचा कालखंड हा अंदाजे शके ११५० ते १२५० असा सांगितला जातो. 'लीळाचरित्र' या ग्रंथाचा पूर्वार्ध महदंबेने चक्रधरांना त्यांच्या पूर्वायुष्याबद्दल जे प्रश्न विचारले त्यातूनच तयार झाला आहे. स्वामी चक्रधरांना प्रश्न विचारण्याचे सामर्थ्य एकट्या महदंबेपाशी होते. त्यावरून तिच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश पडतो. नागदेवाचार्यांनी महदंबेच्या देहावसानानंतर तिच्यासंबंधी "म्हातारी धर्मरक्षक: प्रीतीरक्षक" असे गौरवोद्गार काढले आहेत. स्वामी चक्रधरांच्या देहावसानानंतर त्यांची सर्व शिष्यमंडळी रिद्धपूर येथे गोविंदप्रभूकडे राहयला येतात. त्यात महदंबा असते. गोविंदप्रभूचा स्वभाव हा विचित्र, थोडासा वेडापिसा असतो. अशाच एका प्रसंगाच्या निमित्ताने 'धवळ्या' ची निर्मिती झाली आहे. एकदा एक तेलींण लग्नात बांधावयाचे बाशिंग घेऊन जात असते. तेंव्हा महदंबा तिच्याकडून एक बाशिंग घेऊन जाते व ते बाशिंग गोविंदप्रभुना बांधते. गोविंदप्रभुना तेंव्हा खरोखरच लग्न करण्याची इच्छा होते. गोविंदप्रभूच्या आग्रहाखातर सर्व शिष्यमंडळी त्यांचा

विवाहसोहळा पार पाडतात. विवाह प्रसंगी गीत गाण्याची प्रथा पूर्वीपासून प्रचलित आलेली आहे. गोविंदप्रभू महदंबेला गाण्याचा आग्रह करतात. तेंव्हा ती म्हणते, 'काइ गाओ जी?' यावर ते म्हणतात, 'आवो कृष्ण - रुक्मिणी गाये गाय म्हणे : तुरया थाट गाय म्हणे.' अशा प्रकारे गोविंदप्रभूच्या आज्ञेवरून त्यांच्याच खोट्या खोट्या विवाहप्रसंगी जे गीत महदंबेने गायले ते गीत म्हणजे धवळे होत. म्हणजे विवाहप्रसंगी गावयाचं गीत म्हणजे धवळे होय. महदंबेने धवळ्यांची रचना गोविंदप्रभूच्या सांगण्यावरून जरी केली असली तरी, ही कथा कितीतरी दिवस आधीपासून तिच्या मनात घोळत असली पाहिजे. तिच्या चिंतनाचा तो विषय असला पाहिजे. हे धवळ्याच्या रचनेवरून समजते डॉ. सुहासिनी इर्लेकर धवळयाविषयी म्हणतात, "धवळ्यांचे स्वरूप उत्स्फूर्त आहे. विशिष्ट प्रसंगातून ते जन्मास आले आहेत. हे खरे असले तरी धवळ्याचा जो आशय आहे, त्याची जी कथावस्तू आहे, ती बराच काळ महदंबेच्या चिंतनाचा विषय बनलेली दिसते. या कथावस्तूचे लहान लहान धागे पकडून त्यांना काव्यबद्ध करण्याचा महदंबेला छंद जडला होता. ही गोष्ट कित्येक प्रसंगातून सूचित झालेली आहे. तात्पर्य महदंबेचे 'धवळे' वाटतात तसे निखळ प्रासंगिक स्वरूपाचे नाहीत. ते 'विवाहो स्वीकारू' च्या प्रसंगातून जन्मले असले तरी त्यांच्या संबंधीचा आराखडा महदंबेच्या मनात त्यापूर्वीच तयार झालेला होता."१ त्याच बरोबर धवळ्याची कथावस्तू ही श्रीकृष्ण चरित्रातील अनेकांपैकी एक असी महत्त्वाची घटना आहे. महानुभावीयांच्या दृष्टीने पंचकृष्णाची चरित्रे किंवा आठवणी आठवणे याला पंथीय दृष्टीने खूप महत्त्व आहे. त्यामुळे पंथीय दृष्टीने हे काव्य महत्त्वपूर्ण आहे. धवळ्याची रचना सहज अशी आहे. हे कथा काव्य आहे. मराठी भाषेतील पहिले 'कथाकाव्य' म्हणजे धवळे होय. प्रसंगचित्रण आणि व्यक्तीचित्रण हे कथाकाव्याची प्रमुख वैशिष्ट्ये असतात. ही दोन्ही वैशिष्ट्ये प्रभावीपणे धवळ्यामध्ये आलेली दिसतात. संपूर्ण काव्याला एक प्रवाहीपण लाभलेले आहे. कुठेही पाल्हाळिकपणा किंवा अतिरिक्त वर्णने नाहीत. नेमक्या आणि मोजक्या शब्दातून कथा उलगडत नेली आहे. आटोपशीरपणा हे या काव्याचे वैशिष्ट्ये आहे. धवळ्याची रचना दोन भागात केली आहे. पूर्वार्ध आणि उत्तरार्ध. गोविंदप्रभूच्या विवाहप्रसंगी पूर्वार्ध गाइला आहे. तर गोविंदप्रभूच्या देहावसानानंतर म्हाइंभट व लक्ष्मींद्रभट यांच्या आग्रहावरून उत्तरार्ध गायीला आहे. पूर्वार्धात एकूण ८४ कडवी आहेत. तर उत्तरार्धात ८४ कडवी आहेत. एकूण १४८ कडव्यांचे हे कथाकाव्य आहे. या काव्याची भाषा अतिशय साधी आणि सोपी आहे. ती बोलीभाषा आहे. त्यामुळे या भाषेत सहजता, गोडवा, सौंदर्य आहे. नेमक्या आणि मोजक्या शब्दात प्रसंगवर्णन, व्यक्ती वर्णन करण्याचं सामर्थ्य या भाषेत आहे.

धवळयाची सुरुवात महदंबेने नमनाने केली आहे.

सर्वेश्वराचे शिरी धरूनिया चरण:
मग धवळी गाईन गोविंदुराणा:
जेणे रुक्मिणी हरियली तेंने पोवाडे केले अद्भुत:
पाविजे परमगती भक्ती आईकता कृष्णचरित्र:"।१।

म्हणजे गोविंदप्रभुना नमन करून कथेला सुरुवात केली आहे. यावरून धवळ्याचा हेतू समजतो. नमनानंतर महदंबा लगेच कृष्णकथेकडे वळली आहे. भागवतातील 'रुक्मिणीहरणा' च्या कथेवर लिहिलेले हे पहिले कथाकाव्य आहे. नंतरच्या काळात अनेक जणांनी रुक्मिणी हरणाची कथा काव्यातून गायली; पण या कथेची सुरुवात महदंबेने केली. त्यामुळे हे कथाकाव्य महत्त्वाचे ठरते. डॉ. सुहासिनी इर्लेकर धवळ्या विषयी म्हणतात, "चक्रधर निरुपणांतून पुढे पुष्कळ गद्य ग्रंथ निर्माण झाले. म्हाइंभट, केसोबास, दामोदरपंडित, नरेंद्रपंडित यासारख्या एकाहून एक श्रेष्ठ अशा साहित्यिकांची प्रभावळ उदयास आली. पण चक्रधरांच्या वाणीला खऱ्या अर्थाने शब्दरूप दिले ते महदंबेने."२ रुक्मिणीहरणाची कथा खरतर शृंगारकथा आहे; पण या शृंगारकथेला भक्तीभावपूर्ण कथेत रूपांतरित करण्याचे सामर्थ्य महदंबेच्या ठिकाणी आहे. प्रा.भु. द. वाडीकर या काव्याविषयी म्हणतात, "महदंबेच्या मनात रुजलेल्या या रुक्मिणीविवाह कथेचे निवेदन अतिशय गतिशील आहे. फापटपसारा टाळून अतिशय नाट्यमय पद्धतीने या कथेचे निवेदन केले आहे. नमनाच्या दोन ओळी संपल्याबरोबर कथेच्या गाभ्यालाच हात घातला जातो. प्रसंगामागून येणारे प्रसंग आणि त्या त्या प्रसंगातील पकडलेले नाट्य अतिशय मनोरम आहे."३ यातून या कथा काव्याचे वाङ्मयीन गुणविशेष नजरेत भरतात. या कथाकाव्याला एक प्रवाहीपण आहे. भिमकाकुळी रुक्मिणीचा जन्म होणे, रुक्मिणीचे रूप, गुण या सर्वांचे वर्णन अगदी मोजक्या शब्दात महदंबा करते. एक स्त्री म्हणून रुक्मिणीच्या भावविश्वाशी महदंबा एकरूप झाली आहे.

उदा: "भीमकाकुळी रुक्मिणी केला अवतारू,
रूपे, लावण्यें तिया जिंतला संवसारू"।२।

म्हणजे रुक्मिणीने सगळ्या संसाराला आपल्या लावण्याने मोहिनी घातली होती. एकाच ओळीत रुक्मिणीच्या रूप, गुणाचं वर्णन नेमकेपणे कवयित्री करते. त्यातून तिच्या कवित्वाची कल्पना आपल्याला येते. अशी ही लावण्यवती रुक्मिणी जेंव्हा उपवर होते, तेंव्हा तिच्या वडिलांना तिच्या विवाहाची चिंता लागून राहते. त्याच वेळी नागारी दरबारात येतात आणि कृष्णाच्या रूप, गुणाचे वर्णन करतात. तेंव्हा

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 5.84

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

भिमक राजाला आपल्या कण्येसाठी योग्य वर हा श्रीकृष्णच आहे हे मनोमन पटते. रुक्मिणीनेही कृष्णाची कीर्ती ऐकलेली असते. तिचेही मन श्रीकृष्णावर जडलेले असते ; पण रुक्मिणीचा भाऊ रुक्मि याचा मात्र या लग्नाला विरोध असतो. तो म्हणतो,

"रुक्मिया म्हणे ताता ऐसे केवि कीजे:
"शीशुपाळा वरू ऐसें आईकीलें बाळा:
श्रमु पातली नीन्हा जाली व्याकुळ:
स्मरीले कृष्णरावो देवा संकष्टीं पडलीए थोरी:
तूं एकु वांचोनिया सोडविता अनु नाहीं अवधारी:"।८।

रुक्मिच्या या विरोधामुळे भिमक राजालाही काही म्हणता येत नाही. आणि रुक्मिणीचे लग्न शिशुपाळा सोबत ठरते. वरील वर्णनातून प्रसंगातील नाट्य नेमकेपणे महदंबेने टिपले आहे. रुक्मिणी, रुक्मि, भिमक राजा, रुक्मिणीच्या सख्या, सुदेव ब्राह्मण यांची व्यक्तिचित्रणे नेमकेपणे चित्रीत केली आहेत. संवादातून नाट्य नेमकेपणे पकडले आहे. रुक्मिणीला जेंव्हा आपले लग्न शीशुपाळा सोबत ठरले आहे हे समजते, तेंव्हा तिच्या मनाची झालेली अवस्था नेमकेपणे कवयित्री व्यक्त करतात.

"शीशुपाळा वरू ऐसें आईकीलें बाळा:
श्रमु पातली नीन्हा जाली व्याकुळ:
स्मरीले कृष्णरावो देवा संकष्टीं पडलीए थोरी:
तूं एकु वांचोनिया सोडविता अनु नाहीं अवधारी:"।८।

आपल्याला या प्रसंगातून सोडवण्याचा धावा रुक्मिणी श्रीकृष्णापासी करते. आपला निरोप ती सुदेव ब्राह्मणाकरवी श्रीकृष्णाकडे पाठवते. श्रीकृष्ण रुक्मिणीसाठी द्वारकेहून कुंडीनपूरात येतो व रुक्मिणीचे हरण करून घेऊन जातो. श्रीकृष्ण आणि रुक्मिणी यांचे मिलन होते. इथपर्यंतचा कथाभाग धवळ्याच्या पूर्वार्धात आलेला आहे. खऱ्या अर्थाने महदंबेच्या दृष्टीने ही कथा इथेच संपते; पण म्हाइंभट आणि लक्ष्मींद्रभट यांना मात्र ही कथा अजून पुढे सांगता येईल असे वाटत होते. त्यांनीच महदंबेला उत्तरार्ध लिहिण्यासाठी प्रवृत्त केले. धवळ्याच्या उत्तरार्धामध्ये एकूण ६४ कडवी आहेत. धवळ्याचा पूर्वार्ध जसा उत्स्फूर्त आहे तसा उत्तरार्ध वाटत नाही. याला कारण म्हणजे, पूर्वर्धाची रचना महदंबेने स्वतंत्रपणे केली आहे. उत्तरार्ध मात्र तिने म्हाइंभट व लक्ष्मींद्रभट यांच्या आग्रहामुळे लिहिला आहे. उत्तरार्ध लिहिताना त्यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्यामुळे तिच्या उत्स्फूर्त अशा काव्य गुणांचा आविष्कार येथे फारसा पाहायला मिळत नाही. धवळ्याच्या उत्तरार्धाविषयी वा.ना.देशपांडे म्हणतात, "उत्तरार्ध रचनेचा निदान अर्धा वाटा म्हाइंभट व लक्ष्मींद्रभट या जोडीला द्यावयास पाहिजे; पण या दोघांनी या आख्यायिकेप्रमाणे ज्याअर्थी महदाइसेसाठीच उत्तरार्ध केला त्याअर्थी तो तिच्याच नावाने ओळखला जाणे वाजवी आहे."४ उत्तरार्धामध्ये कृष्ण-रुक्मि संघर्ष व विवाहोत्तर सोहळ्याचे विस्ताराने वर्णन आले आहे. त्यातही भर आहे तो विवाहोत्तर सोहळ्याच्या वर्णनावर. त्यामुळे उत्तरार्धाचे स्वरूप हे बरेचसे वर्णनपर आहे. धवळ्याविषयी डॉ. सुहासिनी इर्लेकर म्हणतात, "धवळ्याची रचना करून महदंबेने दोन कार्य साधली, रुक्मिणीहरण कथेस स्वतंत्र दर्जा प्राप्त करून देणे हे त्यापैकी पहिले कार्य होते. हे कार्य करीत असतानाच महदंबेने दुसरे एक कार्य साधले ते असे की, प्रस्तुत कथेचा काव्यात्म अविष्कार तिनेच प्रथम मराठी भाषेत केला. मराठीतील भावी प्रतिभावंतासाठी रुक्मिणीस्वयंवरकथेचे एक नवे स्वतंत्र दालन प्रथम उभविले ते महदंबेने."५ या दृष्टीने ही कथा महत्त्वाची ठरते.

सामाजिक दृष्टिकोनातूनही हे कथाकाव्य महत्त्वाचे ठरते. तत्कालीन विवाहपद्धतीची माहिती या काव्यातून आपल्याला मिळते.भाषेच्या व वाङ्मयीन गुणविशेषाच्या दृष्टीने महदंबेचे धवळे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. निवेदनात साधेपणा आहे. भाषा ही साधी, सोपी अशी बोलीभाषा आहे. त्यामुळे त्यात एक प्रकारचा गोडवा आहे. हे काव्य ओवीबद्ध आहे आणि ही ओवी मुक्त आहे. त्यामुळे त्याचा संक्षेप विस्तार प्रसंगानुसार होतो. नाट्यात्मकता हाही धवळ्याचा एक विशेष म्हणून सांगता येईल. नेमक्या आणि मोजक्या क्षणी प्रसंगातील नाट्य महदंबेने टिपले आहे. संपूर्ण कथेला एक प्रवाहीपण लाभले आहे. अनलंकृततत्व, अल्पाक्षरत्व हे धवळ्याचे विशेष आहेत. भाषेच्या दृष्टीने जसे हे काव्य महत्त्वाचे आहे, तसेच तत्कालीन समाज जीवनाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे. तेराव्या शतकातील समाजजीवन, रूढी, परंपरा या सर्वांचे दर्शन या काव्यातून घडते एका स्त्री मनाची उत्कट अभिव्यक्ती म्हणून हे काव्य महत्त्वाचे ठरते.

**निष्कर्ष:**

1. एका स्त्री मनाची उत्कट अभिव्यक्ती म्हणजे धावळे होत.
2. तत्कालीन विवाह पद्धतीचे दर्शन त्यातून घडते.
3. कथाकाव्य असले तरी एक स्वतंत्र काव्य म्हणून श्रेष्ठ आहे.
4. साधी, सोपी भाषा व आटोपशीरपणा हे धवळ्याचे विशेष होत.

**संदर्भ:**

1. डॉ. इर्लेकर सुहासिनी - संत कवी आणि कवयित्री एक अनुबंध, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. २००६ पृ.२३
2. उ. नि. पृ.२९

प्रा. [illegible]कर भु. द. - प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, अभय प्रकाशन, नांदेड. प्र. आ. १९९६ पृ. ३४
4. देशपांडे वा.ना.' - आद्य मराठी कवयित्री, प्रस्तावना पृ.१५
5. डॉ.इर्लेकर सुहासिनी- संत कवी आणि कवयित्री एक अनुबंध, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६ पृ.७३

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)